# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११५६/२४/त.क्र.६०/२५/०१**

**श्रीम. वर्षा नितीन केरकर**
३०२, श्रीराज अपार्टमेंट, शरद सोसा.,
३ रा माळा, गोखले रोड, मुलुंड (पूर्व)
मुंबई-४०००८१

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख सुरक्षा अधिकारी (मुख्यालय)**
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय नवीन इमारत प्रवेशद्वार क्र. ७जवळ,
महापालिका मार्ग, मुंबई-४००००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख सुरक्षा अधिकारी (प्र)**
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय नवीन इमारत प्रवेशद्वार क्र. ७जवळ,
महापालिका मार्ग, मुंबई-४००००१

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख सुरक्षा अधिकारी (मुख्यालय) व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख सुरक्षा अधिकारी (प्र) अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, मागणी केलेले CCTV फुटेज देण्यात आलेले नाही.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारदार श्रीम. वर्षा नितीन केरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ अंतर्गत दाखल केलेल्या तक्रार अर्जात अपील क्र.४३२५/२४ दि.२४.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवून तसेच दिलेली माहिती वस्तुस्थिती दर्शक नसल्याचे नमूद करीत संबंधितांवर कार्यवाहीची मागणी केली आहे.

प्रस्तुत तक्रार अर्जावर विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख सुरक्षा बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी उपरोक्त आदेशाचे अनुपालन झाले किंवा कसे तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार

अर्जात नमुद केलेल्या आक्षेपावर सविस्तर उत्तर दाखल करण्याबाबत संधी देण्यात येत असून उपरोक्त तक्रार अर्जाची एक प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख सुरक्षा यांच्याकडे त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी उपरोक्त निर्देशासह संलग्न करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी वरील नोटीस प्राप्त झाल्यानंतर ४ आठवड्याच्या आत खुलासा सादर करावा.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

State Information Commission
Maharashtra